# लिव्ह अँण्ड लायसेन्स करारनामा

मा. दत्तात्रय मारूती झेंडे
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर कमर्शिअल तर्फे
श्री. राजेश जाधव
असि. डेपो मॅनेजर,तथा मालमत्ता विभाग
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे ४११०३७

लिहून घेणार

| हवल - २२ | | |
|---|---|---|
| २४४३ | ६ | १८ |
| २०२४ | | |

अध्यक्ष योगक्षेम प्रतिष्ठान तर्फे
श्री. रविंद्र रामचंद्र वागसकर, वय ५६
फ्लॅट क्र.०१ गोल्डफिल्ड एनक्लेव को.हॉ सोसायटी,साउथ मेन रोड,कोरेगाव पार्क, पुणे सिटी ,पुणे,महाराष्ट्र.

लिहून देणार

सदर लिव्ह अँण्ड लायसेन्स करारनामा हा आज दिनांक ३१/०१/२०२४ रोजी पुणे येथे करण्यात येत आहे लिव्ह अँण्ड लायसेन्सची मुदत दिनांक ०१/०९/२०२३ ते दिनांक ३१/०८/२०२६ अखेर असेल. कारणे लिव्ह अँण्ड लायसेन्स करारनामा लिहून देण्यात येत आहे की,

(अ) मिळकतीचे वर्णन — पुणे महानगर परिवहन महामंडळाचे मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागातील श्री. विनायक उर्फ महेश बाळकृष्ण गवारे, अध्यक्ष योगक्षेम प्रतिष्ठान, ११५, कोरेगाव पार्क, पुणे — ४११ ००१ यांना पेटीट इस्टेट, पुणे स्टेशन बस डेपोचे आवारात १०X१२ चौ.फुट क्षेत्राची मोकळी जागा कॅन्टिनच्या व्यवसायासाठी संचालक मंडळ पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ठराव क्र. ३३ दि. २४/१०/२०११ व क्र. ४७ दि. २८/११/२०११ अन्वये ११ वर्षे कालावधीसाठी लिव्ह अँण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेली होती. सदर कराराची मुदत दि. ३१/०८/२०२३ रोजी संपुष्टात आलेली असून सद्यस्थितीत सदर कॅन्टिनचे जागेसाठी दरमहा निव्वळ लायसेन्स फी रक्कम रु. ७,४२१/— इतके आहे.

सदर जागेला मुदतवाढ मिळणेसाठी अध्यक्ष योगक्षेम प्रतिष्ठान यांच्या दि. २८/०६/२०२२ च्या अर्जास अनुसरुन प्रचलित निव्वळ लायसेन्स फी रकमेमध्ये १२ % वाढ करुन मासिक लायसेन्स फी रुपये ८,३१२/— अधिक १८ % जी.एस.टी. कर याप्रमाणे पुढील ३ वर्षासाठी जागा लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर देण्यास व करारनामा करणेस दि. १८/१०/२०२३ रोजीच्या प्रस्तावास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन खालीलप्रमाणे कराराच्या सर्वसाधारण अटी—शर्ती उभयतामध्ये मान्य करण्यांत येत आहे.

## कराराच्या अटी व शर्ती

१ लिव्ह अँण्ड लायसेन्स कराराची मुदत कराराच्या तारखेपासून ३ वर्षापर्यत राहील. या ३ वर्षाची मुदत दिनांक ०१/०९/२०२३ ते दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत राहील, या ३ वर्ष मुदतीचा करार संपल्यानंतर सदर कराराची सुधारित दराने लायसेन्स फी आकारुन मुदतवाढ द्यावयाची झाल्यास लिहून घेणार यांना संपूर्ण अधिकार आहे व राहतील. लिव्ह अँण्ड लायसेन्स करारानुसार द्यावयाच्या मिळकतीची लायसेन्स फी पुणे महानगर परिवहन महामंडळाने गठित केलेली समिती निश्चित करेल तेवढे अथवा महाराष्ट्र शासन राजपत्र २००८ मधील सुचविलेल्या दर ३ वर्षांनी १२ % लायसेन्स फी वाढ याप्रमाणे जे जास्त असेल ते अदा करणे लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील.

२ लिहून देणार यांनी लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर घेतलेल्या जागेचे दरमहाची जी.एस.टी.सह आगाऊ लायसेन्स फी इंग्रजी महिन्याप्रमाणे १० तारखेच्या आत परिवहन महामंडळाकडे भरणे बंधनकारक राहील. परिवहन महामंडळाकडे सदर मिळकतीकामी अदा करावयाचे मासिक लायसेन्स फी रकमेमधून कोणत्याही

| २४४३ | ६ | १८ |
|---|---|---|
| २०२४ | | |

स्वरूपाची वजावट लिहून देणार यांना करता येणार नाही. ही मासिक लायसेन्स फी करारातील ठरलेल्या अटी – शर्तीनुसार पूर्ण रक्कम अदा करणे आवश्यक राहील.

३ लिहून देणार यांनी दरमहा देऊ केलेल्या लायसेन्स फी मध्ये कोणत्याही शासकीय करांचा, महानगरपालिकेच्या करांचा, वीज बीले इ. करांचा समावेश करण्यात आलेला नाही. निव्वळ देऊ केलेल्या लायसेन्स फी व्यतिरिक्त शासकीय कर, महानगरपालिकेचे कर, वीज बील वगैरेची रक्कम लिहून देणार यांनी अलहिदा स्वत: संबधीत कार्यालयास परस्पर भरावयाची आहे. तसेच या करांमध्ये वळोवेळी होणारी वाढही लिहून देणार यांनी परस्पर भरावयाची आहे. याबाबत लिहून घेणार यांना कोणतीही तोषिश लागणार नाही.

४ सदर करार संपुष्टात येते वेळी लिहून देणार यांचेकडे लायसेन्स फी ची थकबाकी अथवा करांची थकबाकी राहिलेली असल्यास सदरची थकबाकी रक्कम, तसेच जागा ताब्यात घेते वेळी जागेची नासधूस केलेली आढळल्यास, त्याच्या दुरुस्तीस येणारा खर्चही, लिहून देणार यांचेकडून वसूल करून घेण्याचा अधिकार लिहून घेणार यांना राहील.

५ पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. कडून लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर घेतलेली जागा पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या संमतीशिवाय लिहून देणार यांना त्याचे हक्क, गहाण, दान, बक्षिस, भागीदारीपत्र अगर पोटभाडयाने देता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे सदरचे हक्क तबदिल करता येणार नाही किंवा जडजोखमेत गुंतविता येणार नाही.

६ पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट या मिळकतीतील लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावरील घेतलेल्या जागेत लिहून देणार यांनी सुरू केलेल्या धंद्यास कोणत्याही कायद्यानुसार जर परवाने/लायसेन्सची आवश्यकता असेल तर ते लिहून देणार यांनी स्वखर्चाने घेणे बंधनकारक राहतील. सदर अटी या कराराचा एक भाग म्हणून समजण्यात येईल.

७ लिहून देणार यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट या मिळकतीतील लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावरील घेतलेल्या क्षेत्रामध्ये त्यांचे मागणीपत्रात नमूद केल्याप्रमाणे ज्या कारणाकरिता/उपयोगाकरिता लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर घेतलेली आहे त्याच कारणाकरिता/उपयोगाकरिता त्यांचा वापर केला पाहिजे. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी/उपयोगासाठी याचा वापर लिहून देणार यांस करता येणार नाही.

८ पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट या मिळकतीतील लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावरील घेतलेल्या जागेचा करार लिहून देणार यांनी ठराविक मुदतीसाठी घेतलेला असून, त्यांनी वीजेची व्यवस्था व खपाचे बील स्वखर्चाने करावयाचे आहे.

९ लिहून देणार यांनी लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर घेतलेल्या जागेत करावयाच्या व्यवसायापासून आजूबाजूच्या व्यावसायिकांना त्रास किंवा आरोग्यदृष्टया उपद्रव होणार नाही याची काळजी लिहून देणार यांनी घ्यावयाची आहे. तसेच सभोवतालच्या मोकळया जागेचा वापर परिवहन महामंडळाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिहून देणार यांना करता येणार नाही व लिहून देणार यांनी पूर्वपरवानगी न घेता मोकळया जागेचा वापर केल्याचे आढळल्यास लिहून देणार यांचे तेथील सामान, चीजवस्तू अतिक्रमण म्हणून उचलून आणण्याचा अधिकार पुणे महानगर परिवहन महामंडळास राहील व यावावत कोणतीही तक्रार लिहून देणार यांना करता येणार नाही.

१० पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट येथील लिव्ह अँड लायसेन्स धारक, यांस करारातील मुदतीपूर्वी जागा परिवहन महामंडळास परत करावयाची असल्यास अथवा परिवहन महामंडळास सदर जागेची निकड अथवा आवश्यकता वाटल्यास दोघांपैकी कोणासही १ महिने अगोदर लेखी पूर्वसूचना/नोटीस देणे बंधनकारक राहील.

११ लिव्ह ॲण्ड लायसेन्स कराराची मुदत संपल्यावर लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर घेतलेल्या पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट मधील जागेचा ताबा ज्या स्थितीत जागा लिहून घेणार यांनी दिलेला आहे त्या स्थितीत स्वत:चे सर्व सामानसुमान स्वखर्चाने काढून जागेचा तावा परिवहन महामंडळास देणे लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील. यावाबत कोणत्याही प्रकारचे

हवल-२२
२४४३ | ८ | १८
२०२४
THE SENIOR JOINT SUB REGISTRAR HAVELI 22 PUNE CITY

मुदतवाढ अथवा सवलत देता येणार नाही. लिहून देणार यांना सदरची जागा पुढील कालावधीसाठी हवी असल्यास करार संपण्या अगोदर तीन महिने मागणीपत्र देणे आवश्यक राहील.

१२ पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट मधील लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर घेतलेल्या जागेत लिहून देणार यांस पार्टिशन्स अगर तात्पुरते स्वरूपाचे बांधकाम करावयाचे असल्यास त्याबाबतची लेखी परवानगी पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेकडून घेणे आवश्यक असून, त्या परवानगीप्रमाणे बांधकाम करणे लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील.

१३ लिव्ह ॲण्ड लायसेन्स कराराची ३ वर्षाची मुदत संपुष्टात आल्यावर पुढील ३ वर्षाचे काळासाठी मुदत वाढवून देण्यात येईल पुढील कालावधीसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने नियुक्त केलेल्या कमिटीने निश्चित केलेली लायसेन्स फी अथवा महाराष्ट्र शासन राजपत्र २००८ मधील तरतूदीनुसार दर तीन वर्षांनी १२ टक्के लायसेन्स फी मध्ये वाढ यापैकी जे जास्त असेल ती सुधारित लायसेन्स फी पुढील कालावधीसाठी लागू करण्यात येईल. परंतू मुदत वाढवून न दिल्यास सदर जागेचा खुला ताबा स्वखुषीने लिहून देणार यांनी त्वरित परिवहन महामंडळास देणे बंधनकारक राहील.शिवाय लिहून देणार यांस कोणत्याही प्रकारचे नुकसान भरपाई अथवा ते करीत असलेल्या धंद्याचे लौकिक मुल्य मागण्याच्या अधिकार राहणार नाही.

१४ लिहून देणार यांनी लिव्ह ॲण्ड लायसेन्सच्या मुदतीत सलग दोन महिन्याचे अथवा कोणत्याही दोन महिन्याची लायसेन्स फी थकविल्यास अथवा अनियमितपणे भरीत आहेत असे आढळून आल्यास अथवा या करारातील कोणत्याही अटीचे पालन करित नसल्याचे आढळून आल्यास राहीलेल्या मुदतीचा करारनामा रद्द करून सदरचा करार संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक, यांना राहील.

१५ सदर जागेबाबत तसेच व्यवसायाबाबत समक्ष तपासणी करणे, जागेमध्ये प्रवेश करणे, माहिती घेण्याबाबतचा अधिकार पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील संबधित अधिकारी/कर्मचारी यांना राहिल.

१६ पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. च्या मौजे घोरपडी सि.स.न. ११/५, पेटीट इस्टेट या मिळकतीतील लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावरील क्षेत्राचा करारनामा नोंदणीकृत करावयाचा असून त्याकरिता होणारा सर्व खर्च लिहून देणार यांनी करावयाचा आहे. तसेच करारनामा नोंदविण्याची सर्व जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील. सदर कराराची १ प्रत करारनामा रजिस्ट्रेशन झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना देणे बंधनकारक राहील.

१७ लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेल्या जागेत इलेक्ट्रिक फिटींग पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ने केलेली आहे. त्यात कोणताही बदल करावयाचा नाही. या इलेक्ट्रिक फिटींगशिवाय जादा इलेक्ट्रिकचे पॉईटस, फॅन्स, ट्युब्ज, पॉवर पॉईट वगैरे लिहून देणार यांनी स्वखर्चाने करावयाचे असून, त्याबाबत परिवहन महामंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे. कराराची मुदत संपल्यावर लिहून देणार यांना सदरची जागा लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ठेवावयाची नसल्यास जागा परिवहन महामंडळाच्या ताब्यात देतेवेळेस सदर जागेत लिहून देणार यांनी त्यांचे स्वखर्चाने लावलेले पार्टिशन्स, वीजेचे अधिक पॉईटस इत्यादी त्यांनी त्यांच्या स्वखर्चाने काढून घ्यावयाच्या आहेत. हे साहित्य/वस्तु काढून घेत असताना सदर जागेचे काही नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई वसुल करण्याचे अधिकार परिवहन महामंडळास राहतील.

१८ लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा करणेबाबत तसेच या करारातील वरील अटी व शर्ती या व्यतिरिक्त अन्य अटींचा समावेश करणे तसेच जागा लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्याबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांचा निर्णय अंतिम राहील.

१९ लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद अथवा करारामध्ये नमुद करण्यात आलेल्या कोणत्याही अटी व शर्ती संदर्भामध्ये अगर मिळकतीतील जागेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद लवाद आणि सलोखा अधिनियम १९९६ च्या तरतुदीनुसार मिटविण्यात येईल व सदर लवाद नियुक्त करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन

| हवेली - २२ | | |
|---|---|---|
| २४४३ | ९ | ९८ |
| २०२४ | | |

SEAL OF JOINT SUB REGISTRAR (CL-II) HAVELI-22 PUNE CITY

महामंडळ लि. यांना राहतील व जे अधिकारी लवाद म्हणून काम पाहतील त्यांचा निवाडा दोघांवर वंधनकारक आहे ही वाव लिहून घेणार व लिहून देणार यांना मान्य आहे.

२० सदरच्या जागेची महामंडळास आवश्यकता भासल्यास त्यावावत १५ दिवसांची नोटीस वजावुन पुणे महानगर परिवहन महामंडळ सदर जागेचा खुला तावा घेवु शकते ही वाव लिहुन देणार यांना मान्य आहे.

२१ कोणताही वाद हा पुणे क्षेत्र न्यायालयामध्ये राहील.

येणेप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसेन्स करारातील सर्व मजकूर लिहून देणार यांनी वाचलेला आहे व त्याचे कायदेशीर अर्थ त्यांनी समजून घेतलेला आहे आणि तो त्यांना समजलेला आहे. सवव हा लिव्ह अॅण्ड लायसेन्स करारनामा लिहून देणार यांनी राजीखुषीने व अक्कल हुशारीने लिहून दिला असून तो त्यांचेवर त्यांचे वाली वारस/संस्थेवर वंधनकारक राहील हे मान्य करून सदरचा करारनामा लिहून देणार स्वाक्षरी करीत आहे.

ठिकाण: पुणे दिनांक :–

साक्षीदार :–

(१) स्वाक्षरी

नाव : राजेश धावडे

हुद्दा........

पत्ता वडगाव बु. पुणे-४११०४१

(२) स्वाक्षरी Poonam

नाव पुनम कदम

हुद्दा :

पत्ता : पी.एम.पी.एम.एल. सुस रोड, सुस, पुणे-२१

लिहून देणार



अध्यक्ष योगक्षेम प्रतिष्ठान तर्फे
श्री. श्री. रविंद्र रामचंद्र वागसकर,
फ्लॅट क्र.०१ गोल्डफिल्ड एनक्लेव
को हॉ सोसायटी,साउथ मेन रोड,
कोरेगाव पार्क, पुणे सिटी,पुणे,महाराष्ट्र.

लिहून घेणार
मा. दत्तात्रय मा. झेंडे
चिफ ट्राफिक मॅनेजर (कमर्शिअल) तथा
प्र. मालमत्ता विभाग प्रमुख तर्फे
श्री. राजेश जाधव
असि.डेपो मॅनेजर तथा मालमत्ता विभाग
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि
शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे ४११०३७

